ग्राम-

# नमुना दोन

दूरध्वनी-02562 -299268
ई मेल- eduprizpdhule@gmail.com /ssadhule@gmail.com
जावक क्र-शिक्षण /RTE शामा/ 409 /2025
जिल्हा शिक्षणाधिकारी यांचे कार्यालय-शिक्षण विभाग (प्राथ) जिल्हा परिषद धुळे
(जिल्हा /राज्य यांचे नाव ) धुळे (महाराष्ट्र )
युडायस क्रमांक-27020420403

दिनांक- 11 /12/2025

व्यवस्थापक - द शिरपूर एज्युकेशन सोसायटी संचलित

विषय :- बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क अधिनयम 2009 यांच्या कलम च्या 18 च्या प्रयोजनार्थ,बालकांना मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क नियम,2011 यांच्या नियम 11, पोटनियम(4) अन्वयक शाळांना मान्यता प्रमाणपत्र देण्याबाबत.

आपल्या दिनांक- 16/10/2025 च्या अर्जाच्या संदर्भात आणि त्यानंतर या संदर्भात शाळेशी केलेल्या पत्रव्यवहार/शाळेची केलेली तपासणी याआधारे. मी शिक्षणाधिकारी (प्राथ.) जिल्हा परिषद धुळे दिनांक-1/04/2025 पासून ते दिनांक-31/03/2028 पर्यंत तीन वर्षाच्या कालावधीसाठी **इयत्ता 1 ते 8 वी करीता अमरिशभाई आर.पटेल शाळा सी.बी.एस.ई.शिरपुर ता.शिरपुर जि.धुळे जिल्हा धुळे** (शाळेचे नाव व पत्तासह) शाळेस तात्पूरती मान्यता देत आहे.

वरील मान्यंता ही खालील शर्तीच्या पूर्ततेच्या अधीन आहे.

1) मान्यतेचा कालावधी वाढवून मिळणार नाही आणि इयत्ता आठवी नंतर मान्यता किंवा सलग्नता देण्यास कोणत्याही परिस्थितीत कोणतेही बंधन नसेल.
2) बालकांना मोफत व सक्तीचा शिक्षणाचा अधिनियम, 2009(जोडपत्र एक) आणि महाराष्ट्र,बालकांना मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क नियम,2011 (जोडपत्र दोन) मधील तरतूदीचे शाळा पालन करील.
3) शाळा नजीकच्या दुर्बल घटकातील आणि वंचित गटातील बालकांना,पहिल्या इयत्तेत, त्या इयत्तेती विद्यार्थी संख्येच्याकिमान 25% मर्यादेपर्यत प्रवेश देईल. आणि प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यत त्यांना मोफत व सक्तीचे शिक्षण देईल.परंतू आणखी असे की, पूर्व प्राथमिक इयत्तांच्या बाबतीत देखील याप्रमाणकाचे अनुपालन करण्यात येईल.
4) परिच्छेद 3 मध्ये निर्दिष्ट केलेल्या बालकांकरिता शाळेला अधिनियमांच्या कलम 12 (2) नुसार प्रतिपूर्ती मिळेल,अशी प्रतिपूर्ती मिळण्यासाठी शाळेला स्वतंत्र बँक खाते देण्यात येईल.
5) संस्था/शाळा कोणतीही कॅपिटेशन फी वसूल करणार नाही आणि कोणत्याही छाननी पध्दतीसाठी बालकास किंवा त्याच्या किंवा तिच्या मात्या-पित्यास किंवा पालकास भाग पाडणार नाही.
6) कोणत्याही बालकास वयाच्या पुराव्याच्या अभावी, धर्म, जात किंवा वंश, जन्मठिकाण किंवा त्यापैकी कोणत्याही कारणास्तव, शाळेमध्ये प्रवेश नाकारण्यात येणार नाही.
7) (एक) शाळेत प्रवेश दिलेल्या कोणत्याही बालकास तो ज्या इयत्तेत असेल त्याच इयत्तेत रोखून ठेवले जाणार नाही किंवा प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यत शाळेतून काढून टाकण्यात येणार नाही.

(दोन) कोणत्याही बालकास शारीरिक शिक्षा किंवा मानसिक त्रास देण्यात येणार नाही.

(तीन) कोणत्याही बालकास प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यत कोणत्याही मंडळाची परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यकअसणार नाही

(चार) प्राथमिक शिक्षण पूर्ण केलेल्या प्रत्येक बालकास, नियम 23अन्वये निर्धारित केलेले प्रमाणपत्र देण्यात येईल.

(पाच) विकलांग/ विशेष गरजा असलेल्या विद्यार्थ्याचा अधिनियमाच्या तरतुदीनुसार समावेश करण्यातयेईल.

(सहा) अधिनियमाच्या कलम 23 (1) अन्वये निर्धारित केलेली किमान अर्हता धारण करणा-या शिक्षकांची नियुक्ती करंण्यात येईल. परंतु आणखी असे की, अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकास किमानअर्हता धारण न करणा-याशिक्षकांना अशी किमान अर्हता 5 वर्षाच्या कालावधीत संपादित करावीलागेल.ह्य

(सात) अधिनियमाच्या कलम 24 (1) मध्ये विनिर्दिष्ट केलेली त्याची/तिची कर्तव्ये शिक्षक पारपाडतील,आणि

(आठ) शिक्षकाने / शिक्षिकेने खाजगी शिकवणीच्या कामात स्वत:ला गुंतवून घेऊ नये,याचीसुनिश्चिती शाळाकरील.

8) शाळा समुचित प्राधिकरणाने निर्धारित केलेल्या अभ्यासक्रमाचे आधारे तयार केलेल्या पाठयक्रमाचे पालनकरील.

9) शाळा,अधिनियमाच्या कलम 19 मध्ये विहित केल्याप्रमाणे शाळेत उपलब्ध असलेल्या सुविधांच्या तुलनेत विद्यार्थ्यांना प्रवेश देईल.

10) शाळा अधिनियमाचे कलम 19 मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या मानकांचे व प्रमाणकांचे पालन करील.मागील तपासणीच्यावेळेत शाळेत उपलब्ध असलेल्या सुविधा खालीलप्रमाणे होत्या:-

- -शाळेच्या परिसराचे क्षेत्रफळ - 9500 चौ.मी.
- -एकूण बांधकाम क्षेत्र - 6394.55 चौ मी.
- -खेळाच्या मैदानाचे क्षेत्रफळ - 5500 चौ.मी.
- -वर्गखोल्यांची संख्या -40
- -कार्यालयीन नि-भांडार-नि- मुख्याध्यापकांची खोली- 03
- -मुलांसाठी व मुलींसाठी स्वतंत्र प्रसाधन गृहे-जेथे वापरण्यासाठी व प्रसाधनगृहे स्वच्छ आणि आरोग्यदायी स्थितीत ठेवण्यासाठी पुरेसे पाणी असेल. आहे
- -पिण्याच्या पाण्याची सुविधा. - आहे
- -दुपारचे जेवण शिजविण्यासाठी स्वयंपाक घर.-1
- -अध्यापन अध्ययन साहित्य/खेळ व क्रिडाविषयक सामग्री/ग्रंथालय यांची उपलब्धता
- -वाचन साहित्य विनासायास उपलब्ध. आहे

11) मान्यता नसलेले वर्ग किंवा तुकडया,शाळेच्या नावाने शाळेच्या परिसरात किंवा इतरत्रचालविता येणार नाहीत.

12) शाळेची इमारत किंवा इतर बांधकाम किंवा क्रिडांगण हे केवळ शिक्षणाच्या व कौशल्यविकासाच्या प्रयोजनार्थ वापरले येतील.

13) शाळा, सोसायटी नोंदणी अधिनियम 1860,(1860 चा 21) किंवा मुंबई सार्वजनिकविश्वस्त व्यवस्था अधिनियम,1950 अन्वये नोंदणी झालेल्या संस्थेमार्फत चालविण्यातयेत आहे.

14) शाळा कोणत्याही व्यक्तीच्या,गटाच्या किंवा व्यक्ति संघाच्या किंवा इतर कोणत्याहीव्यक्तीच्या फायद्याकरिता किंवाकोणताही नफा मिळविण्यासाठी चालविण्यात येत नाही.

15) शाळेचे लेखे सनदी लेखापालाकडून लेखापरिक्षित व प्रमाणित करुन घेतले आहेत. आणिनियमांनुसार योग्य लेखा विवरणपत्रे तयार केली आहेत. प्रत्येक लेखा विवरणपत्राची एक प्रतदरवर्षी जिल्हा शिक्षणाधिका-यांकडे पाठविण्यात यावी.

16). तुमच्या शाळेला मिळालेल्या मान्यता संकेतांक DHL/SHR/PPUA/ENG/P-57 आहे.या कार्यालयांशी कोणताही पत्रव्यवहार करतांना कृपया तो नमूद करावा,याची नोंद घ्यावी.

17) शिक्षण संचालक / जिल्हा शिक्षणाधिकारी वेळोवेळी मागणी करतील असे अहवाल वमाहिती शाळेने सादर करावीकिंवा शाळेच्या मान्यतेच्या शर्तीची निरंतर पूर्तता करण्यासाठीकिंवा शाळेच्या कामकाजातील त्रृटी दूर करण्यासाठी शासन किंवा स्थानिक प्राधिकरण देईलअशा सूचनांचे पालन करावे.

18) संस्थेच्या नोंदणीचे कोणतेही असल्यास नूतनीकरण केल्याची सुनिश्चित करावी.

19) 'जोडपत्र' तीन नुसार इतर शर्ती यासोबत जोडल्या आहेत.

शिक्षणाधिकारी (प्राथ)
जिल्हा परिषद,धुळे